# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ केंस क्र.७३/२०१६-१७/२०५ दिनांक : ०३-०६-२०१७

**<u>आदेश केस क्र.७३/२०१६-१७</u>**

| | | |
|---|---|---|
| | श्री राजेंद्र विश्वासराव माने<br>श्री अंबाई डिफेन्स को-ऑप. हौसिंग सोसायटी<br>प्लॉट क्र.५३ (सि.स. क्र.३७४/३०)<br>कोल्हापूर | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर. | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>शहर विभाग कोल्हापूर | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | अतिरिक्त कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>पूर्व उपविभाग ,कोल्हापूर | |

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय जाहीर करीत आहे.

## संक्षिप्त पार्श्वभूमी

१) कोल्हापूर शहरातील ई वॉर्डमधील श्री अंबाई डिफेन्स को-ऑप हौसिंग सोसायटी मधील प्लॉट क्र.५३ म्हणणे सि.स.क्र.३७४/३० क्षेत्र २९८ चौ.मी. ही १२ खोल्यांची मिळकत कै. विश्वासराव माने यांची मालकीची होती. विश्वासराव हे माजी सैनिक होते व त्यांना सदर भूखंड १९६४ मध्ये मिळाला होता. विश्वासराव हे दिनांक ०५-१२-२०१० रोजी मृत्यू पावले. त्यांच्या पत्नी श्रीमती प्रभावती या दि. १४.०१.२०१२ रोजी मृत्यू पावल्या . विश्वासराव व प्रभावती यांना प्रस्तुत तक्रारदार - श्री राजेंद्र आणि सुरेंद्र व सुभाष असे तीन मुलगे वारस आहेत. उपलब्ध कागदपत्रे दर्शवितात की, तक्रारदार यांच्या म्हणण्याप्रमाणे, कै. विश्वासराव यांनी केलेल्या मृत्यूपत्राप्रमाणे ते वरील मिळकतीचे एकटे मालक झाले आहेत. सुरेद्र व सुभाष यांच्या म्हणण्यानुसार सदर मिळकत एकत्र कुटुंबाची आहे. सदर मिळकतीत कै. विश्वासराव यांचे नांवे ग्राहक क्र. २६६५१०५५७७५१ ची वीज जोडणी चालू होती. ती दि. १६.०६.२०१६ रोजी थकबाकीमुळे कायम स्वरुपी बंद करणेत आली. वरील मिळकतीत सुभाष विश्वासराव माने यांचे नावे ग्राहक क्र. २६६५११९६६२६४ ची वीज जोडणी चालू आहे. कै. विश्वासराव यांचे नावे असलेली उपरोक्त वीज जोडणी डिसेंबर २०१५ पासून आपल्या वापरात नाही असे तक्रारदार यांनी एक अर्जात मान्य केले आहे. म्हणजेच नोव्हेंबर - डिसेंबर-२०१५ पर्यन्त कै. विश्वासराव यांच्या वीज जोडणी मधून तक्रारदार हे वीज वापरत होते हे त्यांना मान्य आहे. विश्वासराव यांचे नावची वीज जोडणी थकबाकीसाठी दि. १६.०६.२०१६ रोजी कायमपणे बंद केली. तक्रारदार यांनी दिनांक ११-०३-२०१६ रोजी वि.प.कडे दिलेल्या अर्जावरुन त्यांना दिनांक १२.०५.२०१६ रोजी नविन वीज जोडणी देण्यात आली परंतु नंतर त्यांचा वीज पुरवठा तोडल्यामुळे त्यांनी या मंचाकडे दाखल केलेल्या अर्जावरुन दि. २९-०३-२०१७ च्या अंतरिम आदेशाने वीज पुरवठा त्वरीत चालू करण्यात आला. तो कायद्यास व नियमास अनुसरुन यापुढेही चालू राहिल. आता या अपिलाचे कामी एवढाच प्रश्न उपस्थित होतो की, कै. विश्वासराव यांचे वीज जोडणीवरील थकबाकीची रक्कम रु. ८,२६३.६५ पै. भरण्यास तक्रारदार जबाबदार आहेत किंवा नाहीत. सदरची थकबाकी मुदतबाहय झाल्याचे तक्रारदार यांचे कोठेही विधान नव्हते व नाही. अंतरिम आदेश मिळणेबाबत तक्रारदार यांनी केलेल्या विधानांचा फारसा उल्लेख या न्यायनिर्णयात करणेत येत नाही.

## गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप

२) तक्रारदार कथन करता की, कै. विश्वासराव यांच्या नांवच्या वरील वीज जोडणीचा वापर त्यांचा भाऊ सुभाष हा करीत होता. सुभाष यांनी वरील मिळकती पैकी काही खोल्या बेकायदेशीरपणे व दरशतीने ताब्यात घेतल्या. त्याबाबत न्यायालयामध्ये दावे प्रलंबित आहेत. तक्रारदार रहात असलेल्या खोल्या मधील वीज पुरवठा सुभाष यांनी डिसेंबर २०१५ मध्ये तोडल्यामुळे तक्रारदार यांनी जानेवारी २०१६ मध्ये नविन घरगुती वीज जोडणी मिळणेसाठी वि.प.यांचेकडे अर्ज सादर केला. त्यामध्ये टाळाटाळ झालेनंतर तक्रारदार यांनी दि. ११.०३.२०१६ रोजी वीज जोडणी मिळणेचा नविन अर्ज सादर केला. अखेर ब-याच विलंबानंतर त्यांना मे २०१६

मध्ये नविन वीज जोडणी देणेत आली. मार्च २०१६ मध्ये नविन वीज जोडणी मिळणेच्या अर्जा सोबत तक्रारदार यांनी थकबाकीबाबत कोणतेही प्रतिज्ञापत्र दिले नव्हते . जानेवारी २०१६ मध्ये दिलेल्या अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचा वि.प. यांनी गैरवापर केला. सुभाष माने यांच्या ताब्यातील आठ खोल्यामध्ये कै. विश्वासराव  यांचे नांवे व सुभाष यांचे नांवचे अशा दोन वीज जोडण्या चालू होत्या. परंतु कै. विश्वासराव यांची थकबाकी सुभाष यांचे वीज देयकात वर्ग न करता ती तक्रारदार यांचे वीज देयकात वर्ग संगनमताने केली आहे. सबब सदरची थकबाकी रद्द करुन मिळणेबद्दल तक्रारदार ंयानी प्रस्तुत अपिल दि. २७-०३-२०१७ रोजी या मंचासमोर दाखल केले आहे. तक्रारदार यांनी या विनंतीचा अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे सादर केलेला दिनांक २८-१२-२०१६ चा तक्रार अर्ज सदर कक्षाने दि. ०३.०३.२०१७ च्या आदेशाने फेटाळला आहे.

३) कै. विश्वासराव माने यांच्या नांवच्या ग्राहक क्र. २६६५१०५५७७५१  या दिनांक १६.०६.२०१६ रोजी कायमपणे तोडलेल्या वीज पुरवठयास यापुढे या निकालपत्रात वादग्रस्त वीज जोडणी/ कनेक्शन असे संबोधणेत आले आहे.

## वि.प. यांची  भूमिका

४) वादग्रस्त वीज जोडणी तक्रारदार यांच्या वडिलांचे नावे होती आणि त्यावरील थकबाकी भरणेची तक्रारदार यांची जबाबदारी आहे व तशी हमीही त्यांनी प्रतिज्ञापत्राद्वारे घेतली होती. दिनांक १२-०५-२०१६ पूर्वी तक्रारदार हे वादग्रस्त वीज जोडणी वरुन वीज वापरीत असल्याचे जनमित्र श्री आप्पा पंडीत चव्हाण यांच्या निदर्शनास आले होते. तसेच शाखा अभियंता प्रतिभानगर यांना सुध्दा प्रत्यक्ष पहाणीचे वेळी असेच निदर्शनास आले होते. वादग्रस्त वीज जोडणी कायमपणे बंद केल्यानंतर तक्रारदार यांनी दिलेल्या प्रतिज्ञापत्राप्रमाणे त्यावरील थकबाकी भरणेबद्दल तक्रारदार यांना नोटीस पाठवली. परंतु दि. १२-०७-२०१६ च्या पत्राने सदर थकबाकी त्यांच्या भावांनी (सुभाष व सुरेंद्र) भरावी असे तक्रारदार यांनी कळविले. तक्रारदार यांनी वादग्रस्त वीज जोडणी वरुन यापूर्वी स्वत:साठी वीज वापरली होती. थकबाकी तक्रारदार यांच्या वीज देयकावर वर्ग केल्याची कारवाई योग्य आहे वि.प. यांनी शेवटी, हे अपिल रद्द करुन न्यायाचे आदेश व्हावेत असे नमूद केले आहे.

५) या पकरणाची सुनावणी दि. १६.०५.२०१७ रोजी या मंचासमोर घेणेत आली.
त्यावेळी तक्रारदार स्वतः हजर होते व त्यांनी तोंडी युक्तिवाद केला. वि.प. तर्फे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री आर.एन. चव्हाण, सहाय्यक अभियंते श्री डी.पी. पाटील, व श्री एस.ए. चव्हाण आणि सहाय्यक लेखापाल श्री हेमत पोळ, हजर होते. वि.प. तर्फे तोंडी युक्तिवाद ऐकणेत आला आहे, सर्व उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली आहेत.

६) या मंचाचे निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) वादग्रस्त वीज जोडणी वरील येणे असलेली थकबाकी तक्रारदार यांच्या वीज देयकावर वर्ग केल्याची वि.प. यांचेतर्फे करणेत आलेली कारवाई अयोग्य अन्यायकारक व बेकादेशीर आहे काय?

उत्तरः- नाही.

२) तक्रारदार हे कै. विश्वासराव यांच्या नावच्या कायमपणे बंद केलेल्या वीज जोडणीवरील थकबाकी भरणेस जबाबदार नसल्याचे ते सिध्द करतात काय?

उत्तरः- नाही

३) कोणता अंतिम आदेश?

उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## कारणमिमांसा

७) वर परिच्छेद १ मध्ये वर्णन केलेली स्थावर मिळकत कै. विश्वासराव यांचे नावे व मालकीची होती असे येथे म्हणवयास काहीच हरकत नाही. तक्रारदार यांची आई (प्रभावती ) व भाऊ (सुभाष व सुरेंद्र) यांनी दिवाणी कोर्टात दाखल केलेल्या दावा क्र.५५/२०११ या दाव्यातील निशाण-५ अर्जावरील आदेशाची प्रत तक्रारदार यांनी दाखल केली आहे. त्यावरुन असे स्पष्टपणे दिसून येते की, कै. विश्वासराव यांनी रितसर केलेल्या इच्छा पत्रानुसार तक्रारदार हे सदर स्थावर मिळकतीचे एकटेच मालक व वहिवाटदार आहेत.असे त्यांचे म्हणणे आहे. दिवाणी न्यायालयाचा निशाण-५ वरील निर्णय वाचला असता असे दिसते की, त्यावेळी सुभाष व सुरेंद्र हे दोघेही वाद मिळकतीत रहात नव्हते, तर कोल्हापूर शहरात इतर ठिकाणी रहात होते असे न्यायालयास आढळून आले होते. अर्थात , पुढे काही काळानंतर सुभाष वगैरे यांनी वाद मिळकती मधील काही खोल्यांचा दहशतीने ताबा घेतला असे तक्रारदार यांचे म्हणणे आहे.

८) तक्रारदार यांनी एक अर्ज शाखा अधिकारी म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रतिभानगर, कोल्हापूर यांचेकडे (दि. ११-११-२०१६ रोजी) सादर केला होता. त्यामध्ये त्यांनी असे लिहिले आहे की, वादग्रस्त वीज जोडणी सुभाष माने यांनी बेकायदेशीररित्या ताब्यात घेतलेल्या खोल्यात असून सुभाष यांचे वापरात आहे. त्यामुळे त्यावरील थकबाकीशी तक्रारदार यांचा संबंध नाही. सदर अर्जात असेही स्पष्टपणे नमूद केले आहे की " माझे वडीलांचे नांवे असलेले वीज कनेक्शन माझे वापरात डिसेंबर २०१५ पासून नसलेले. . . " म्हणजे, किमान डिसेंबर २०१५ पर्यन्त तक्रारदार हे वादग्रस्त वीज जोडणी वरुन स्वतःसाठी वीज वापर करीत होते हे स्पष्ट होत आहे.

९) श्री आप्पा पंडीत चव्हाण, जनमित्र यांच्या दि. ०७-०१-२०१७ च्या जबाबानुसार , तक्रारदार यांच्या रहात्या जागेत किमान दिनांक ०६-०५-२०१६ पर्यन्त वीज वापर चालू होता.

१०) कै. विश्वासराव यांनी त्यांचे हयातीत केलेल्या मृत्यूपत्राने आपण एकटे उपरोक्त स्थावर मिळकतीचे संपूर्ण मालक झाल्याचे तक्रारदार यांचे न्यायालयांमध्ये स्पष्ट कथन आहे. त्यांचे असेही म्हणणे आहे की, त्यांच्या भावांचा सदर प्रॉपर्टीशी काहीही संबंध नसताना त्यांनी काही जागेचा घुसखोरी करुन दहशतीने ताबा घेतला आहे. असा ताबा त्यांनी निश्चितपणे केव्हा घेतला याचा खुलासा तक्रारदार यांनी केलेला नाही. या प्रकरणात वर नमूद केल्याप्रमाणे , तक्रारदार यांनी वादग्रस्त वीज जोडणी वरुन वीज वापरल्याचा सकृतदर्शनी सबळ पुरावा उपलब्ध आहे.

११) दिनांक २०-०२-२०१६ च्या तक्रारदार यांच्या ॲफीडेव्हीटवरुन बराच वादंग उपस्थित करणेत आला आहे. तक्रारदार यांच्या विधानाप्रमाणे सदरचे प्रतिज्ञापत्र त्यांनी जानेवारी २०१६ मध्ये वि.प.कडे सादर केलेल्या नविन वीज जोडणी मिळणेच्या अर्जासोबत सादर केले होते आणि ते व इतर कागदपत्र परत न देता त्यांचा गैरवापर वि.प. हे करीत आहेत. दि. २०.२.२०१६ चे ॲफीडेव्हीट तक्रारदार यांनी कार्यकारी दंडाधिकारी, करवीर या शपथ देण्याचा कायदेशीर अधिकार असलेल्या सक्षम अधिका-या समोर शपथेवर केले होते. त्यामध्ये त्यांनी ". . .मिळकतीमध्ये जुन्या लाईट बिलाची थकीत रक्कम निघालेस ती मी भरणेस तयार आहे. . ." वगैरे विधाने शपथेवर केलेली होती. सदर विधाने खोटी दिसून आल्यास शिक्षेस पात्र राहिन असेही लिहून दिले होते. क्षणभर, सदरचे ॲफीडेव्हीट जानेवारी २०१६ मध्येच अर्जासोबत वि.प. यांना सादर केले होते असे जरी मानले तरी ते केवळ त्या कारणावरुन अग्राहय ठरत नाही. त्यामधील शपथेवर केलेल्या विधानांना महत्व असून ते केव्हा सादर केले याला महत्व देता येत नाही. या कारणांस्तवही कै. विश्वासराव यांचे नांवची थकबाकी भरणेची जबाबदारी तक्रारदार यांचेवर निश्चितपणे येते , ती त्यांना टाळता येत नाही.

१२) नविन घरगुती वीज जोडणी मिळणेचा पहिला अर्ज तक्रारदार यांनी जानेवारी २०१६ मध्ये वि.प.कडे सादर केला असताना त्यामध्ये दि. २० फेबुवारी २०१६ रोजी पूर्ण केलेले प्रतिज्ञापत्र दाखल केले असू शकत नाही. ते काहीही असो. प्रतिज्ञापत्राबाबतचे तक्रारदार यांचे सर्व आक्षेप अस्विकारार्ह आहेत.

१३) तक्रारदार यांनी वि.प. यांच्या काही अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द काही स्वरुपाचे आरोप केले आहेत. परंतु वादाचा सध्याचा विषय विचारात घेता त्या आरोपांची चौकशी करणेची गरज वाटत नाही. तसेच तक्रारदार यांनी त्यांचे भावांविरुध्द केलेल्या अनेक विधानाचा आणि आरोपांचा (त्यांच्या अपरोक्ष) विचार करण्यास हे मंच सक्षम नाही.

१४) तक्रारदार यांनी आपल्या गा-हाण्यात असे नमूद केले आहे की, वादग्रस्त वीज जोडणी त्यांचे भाऊ सुभाष यांनी दांडगाव्याने कब्जात घेतलेल्या खोल्यात असून त्या वीजेचा वापर सुभाष हेच करत होते. तक्रारदार हे सुभाष यांचे विरुध्द योग्य त्या न्यायालयात वीज थकबाकीबाबत कारवाई न करता सुभाष यांच्या अपरोक्ष, या मंचाकडून थकबाकीतून आपली सुटका करुन घेणेचा प्रयत्न करीत आहेत हे स्पष्ट होत आहे. तक्रारदार व त्यांचे भाऊ यांचे दरम्यान असलेल्या वादाच्या विषयाचा निर्णय हा मंच करु शकत नाही.तर तो अधिकार सक्षम न्यायालयाचा आहे.

१५) दिवाणी दावा क्र.५५/२०११ मधील निशाण ५ च्या अर्जाचा दिनांक १८-०२-२०११ रोजी निर्णय करताना दिवाणी न्यायालयाने वादातील मिळकतीत प्रस्तुत तक्रारदार यांचाच ताबा असून त्यांची आई व इतर बंधू राजारामपूरी आणि कसबा बावडा येथे रहातात असा निष्कर्ष पुराव्याचे आधारे काढला होता.

१६) वरील सर्व परिस्थितीत तक्रारदार यांच्या या मंचा समोरील थकबाकी बद्दलच्या गा-हाण्यात काहीही तथ्य दिसत नाही. अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने याबाबतचे तक्रारदारांचे गा-हाणे फेटाळण्याचा केलेला दिनांक ०३-०३-२०१७ चा आदेश योग्य व न्यायसंगत आहे. त्यामध्ये या मंचाने हस्तक्षेप करण्यास योग्य व संयुक्तिक कारणे नाहीत.

सबब खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

**आदेश**

१) तक्रारदार यांच्या वीज देयकावर कै. विश्वासराव माने यांच्या कायमपणे बंद केलेल्या ग्राहक क्र. २६६५१ ०५५७७५१ या वीज जोडणी वरील थकबाकी , वर्ग केल्याची कारवाई रद्द करणेबाबतची त्यांची मागणी नामंजूर करण्यात येत आहे.

२) कै.विश्वासराव माने यांच्या उपरोक्त वीज जोडणी वरील थकबाकी भरण्यास तक्रारदार जबाबदार असल्यामुळे सदरची थकबाकी त्यांनी दिनांक ३०.०६.२०१७ रोजी अगर त्यापूर्वी विनाकसूर वि.प.यांचे कार्यालयात भरणा करावी.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |